

# ३. गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

महाराष्ट्र राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

ही योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागांतर्गत 'गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे' या नावाने शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून राबविण्यात यावी.

### या योजनेची व्याप्ती पुढीलप्रमाणे राहिल :–

सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता लागू राहील. ज्या मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना अशा स्वरूपाची परदेशी शिष्यवृत्ती लागू केली आहे अशा मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यींनी त्या–त्या प्रशासनिक विभागाच्या योजनेमध्ये अर्ज करणे अपेक्षित आहे. विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

सदर शिष्यवृत्तीसाठी शाखा निहाय मर्यादा प्रत्येक वर्षासाठी निश्चित करण्यात येत आहे. सध्यस्थितीत परदेशी शिष्यवृत्ती साठी ५० विदयार्थी संख्या आहे. त्यामध्ये वाढ करून ७५ विध्यार्थी संख्या करण्याबाबत ऑगस्ट २०२३ रोजी निर्णय घेण्यात आला आहे.

सदर शिष्यवृत्ती कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, विधी अभ्यासक्रम, अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशात्र व PHD या ८ शाखा व अभ्यासक्रमासाठी, पदव्युत्तर पदवी/ पदविका, डॉक्टरेट साठी शिष्यवृत्ती देण्यात येते

सदर योजनेचे लाभाचे स्वरूप, वयोमर्यादा, उत्पन्न या बाबतचा सर्वसाधारण अटी व शर्ती या संदर्भात सर्व विभाग राबवित असलेल्या परदेशी शिष्यवृत्ती मध्ये एकसूत्रता आणण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय दिनांक ३०-१०-२०२३ अन्वय या साठी खालील प्रमाणे निकष ठरविण्यात आलेले आहे

- परदेश शिष्यवृत्ती ही योजना राबविण्याकरीता विभागवार खालीलप्रमाणे विद्यार्थी सख्या निश्चित करण्यात येत आहे.
- इतर मागास व बहुजन कल्याण विभाग (इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग) ७५ विद्यार्थी

**परदेश शिष्यवृत्तींचे निकष-**

१. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लक्ष इतके मर्यादित असावे.

२. OS World Ranking नुसार ज्या विद्यापीठाचे मानांकन २०० च्या आतमध्ये आहे. त्या विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच या योजनेचा लाभ देण्यात येईल.

३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत परदेश शिष्यवृत्तीकरीता QS World Ranking नुसार पहिल्या १०० विद्यापीठाकरीता उत्पन्नाची मर्यादा नसल्याची अट रद्द करण्यात येत आहे.

४. सर्व विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती आधार संलग्न करणे आवश्यक आहे.

५. सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय क. इवीसी-२०१७/प्र.क्र.२८८/शिक्षण-१ नियमावलीचे सर्व विभागांनी प्रमाण मानावे. (विद्यार्थी पात्रतेचे निकष व विद्यापीठ निवडीचे निकष)

उपरोक्त निर्देह्याप्रमाणे परदेशी शिष्यवृतीसाठी इतर मागासप्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्याजमती व विशेष मागासप्रवर्ग या प्रवर्गासाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षा पसून ५० ऐवजी ७५ एवढी विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात अली आहे व त्या नुसार अतिरिक्त मुख्य सचिव वित्त यांच्या अध्यक्षतेखालील शासन निर्णय दिनांक ३०-१०-२०२३ अन्नव्ये दिलेल्या निर्देसहा प्रमाणे परदेशी शिष्यवृतीसाठी सुधारित अटी व शर्ती बाबतचा शासन निर्णय स्वातंत्रपणे निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे

## ४. भारत सरकार शिष्यवृर्ती अंतर्गत परराज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (Interstate scholarships )

शासन परिपत्रक, दिनांक १२.०९.२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील परराज्यात शासन मान्य व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांना केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१७-१८ पासून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती विदयार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- **सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क :- प्रादेशिक उपसंचालक व संबंधित जिल्हा सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
- **शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती-२०१८/प्र.क्र,११८/शिक्षण दि. ११/१०/२०१८ इतर मागास बहुजन कल्याण विभाग**